# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०१ मार्च २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक ०१ मार्च २००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणीबाई राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १२.०० वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.भाऊसाहेब ताठे
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणि ठकुजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतु
१०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडूजी
११. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१२. स.स.श्री.राजु रामराव शिंदे
१३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१५. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१७. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१८. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
२०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
२१. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२६. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२७. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२८. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२९. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
३१. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
३२. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३३. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३४. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३५. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३६. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़ार यारखान

३७. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३८. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३९. स.स.श्री.महम्मद जावेद महम्मद इसहाक
४०. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४१. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४२. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४३. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४४. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४५. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४६. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४७. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४८. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४९. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५०. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५१. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५२. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५३. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५४. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५५. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५६. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५७. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
५८. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
५९. स.स.श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६०. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६१. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६२. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
६३. स.स.श्री.तनवाणि किशनचंद लेखराज
६४. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०२. स.स.श्री.तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन
०३. स.स.सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद :**

श्री.काशिनाथ कोकाटे : मा.माजी मुख्यमंत्री व मराठवाड्याचे सुपूत्र स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांचे दु:खद निधन झाले. या शहरासाठी त्यांनी मोलाचे काम केलेले असून त्यांचा सिहांचा वाटा आहे. या मराठवाड्याच्या जनतेसाठी व या शहरातील जनतेसाठी त्यांनी विशाल दृष्टीकोन समोर ठेवून जो जायकवाडी प्रकल्प उभारला गेला व या शहरासाठी पिण्याची पाण्याची योजना सफ़ल ठरली. जे जे कार्य या शहरासाठी व मराठवाड्यासाठी त्यांना करता आले ते त्यांनी केलेले आहे अशा थोर नेत्याला या सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यांत यावी.

श्री.जयवंत ओक : स.सदस्य श्री.कोकाटे यांनी जी सूचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.भागवत कराड : माजी मुख्यमंत्री तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री,माजी शिक्षणमंत्री तसेच इतरही खात्याचे मंत्री पद भुषविलेले असे स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. मराठवाड्यासाठीच नव्हे तर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक विकासाची कामे केलेली आहेत. जायकवाडी प्रकल्प त्यांचे प्रयत्नामूळेच झालेला आहे. ते सामाजिक कार्यकर्ते सुध्दा होते. त्यांना या सभागृहातर्फे भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करून त्यांचे कुटूंबीयांना तसा संदेश पाठविण्यात यावा.

श्री.रतनकुमार पंडागळे : आताच स.सदस्यांनी श्रध्दाजंली बाबत सुचना मांडली. स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांनी अत्यंत मोठ्या प्रमाणात विकासाला चालना दिलेली आहे. त्यांनी मराठवाड्यासाठीच नव्हेतर या शहराच्या विकासाची कामे केलेली आहे हे विसरून चालता येणार नाही. जायकवाडी प्रकल्प उभारून मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. त्यांचे विचार समोर ठेवून विकास कामे केली तर नक्कीच मोठ्या प्रमाणात विकास होवू शकेल.

श्री.जयवंत ओक : स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. माझ्याच वार्डात त्यांचे निवासस्थान होते. तेथे ते प्रत्येक शनिवार, रविवार या दिवशी नागरीकांच्या तक्रारी ऐकूण घेत असत. भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी. या शहराला जो पाणी पूरवठा होतो आहे तो त्यांचे प्रयत्नामूळेच होत आहे. त्यांचे कार्य चांगले होते. या सभागृहात त्यांचे तैलचित्र लावण्यात यावे, त्यास सर्वानूमते मंजूरी द्यावी.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. ते नांदेडचे रहिवासी असले तरी त्यांची जन्मभूमी ही पैठण आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी अत्यंत मोलाचे काम केलेले आहे. त्यांनी अनेक मंत्री पदे भूषविलेली असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे. श्रध्दाजंली बाबत जी सूचना केली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : ठिक आहे. सर्वांनी श्रध्दाजंली साठी उभे राहावे.

याचवेळी स्व.श्री.शंकरराव चव्हाण यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करण्यांत आली.

मा.महापौर : निवडणूकी बाबतची आचारसंहिता लागू झालेली आहे, त्यामूळे आजची सभा तहकूब करण्यांत येत आहे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद